Education Through Self-Help is our motto: Karmaveer

Rayat Shikshan Sanstha's

# BALWANT COLLEGE, VITA

(Affiliated to Shivaji University, Kolhapur)
Reaccredited by NAAC with 'A' grade, CGPA 3.1*
DST-FIST., RUSA Funded College. ISO 9001-2015 certified

# CERTIFICATE

This is to certify that Dr.M.K.Shinde of Shri Mulikadevi College, Nigave has participated in two days 3rd International Multidisciplinary Conference on Emerging Trends in Humanities, Commerce, Management, Science and Technology (IMCET-2021) organized by the Balwant College, Vita Dist. Sangli (MS) on 23rd–24th December 2021.

He / She has participated and presented a research paper entitled साठोत्तरी साहित्य प्रवाहातील विमुक्तांचे वैचारिक लेखन

| | | | |
|---|---|---|---|
| Prof. Dr. C. R. Bobade | Dr. A. S. Sattape | Dr. V. B. Patil | Prin. Dr. R. S. More |
| Organizing Secretory | Co-ordinator | Convener | Chairman |

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक – तिसरा; जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२१

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

• संपादक •
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

## साठोत्तरी मराठी साहित्य विशेषांक

वर्ष १२ वे, अंक – तिसरा; जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२१

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे

● संपादक मंडळ ●

डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. फुला बागूल
डॉ. अनिल गर्जे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. वंदना महाजन
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने

मूल्य : १५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद– ४३११०३. मो. ९९०४००३९९८

# संपादकीय...

- संपादक

अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शीर्षक / लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १ | **मराठी साहित्यातील साठोत्तरी प्रवाह** - बाळासाहेब आण्णा सुतार | 1 - 8 |
| २ | **दलित साहित्य प्रवाहाच्या निर्मितीची समाजशास्त्रीय चिकित्सा** - डॉ. सहदेव शरद चव्हाण | 9 - 14 |
| ३ | **साठोत्तरी साहित्य प्रवाहातील विमुक्तांचे वैचारिक लेखन** - डॉ. एम. के. शिंदे | 15 - 20 |
| ४ | **१९६० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील नवे विषय आणि नवा आशय** - श्री. हनुमंत गणपत निमसे | 21 - 25 |
| ५ | **मराठी विज्ञान कथा : स्वरूप व विशेष** - डॉ. शिवाजी विष्णू पाटील | 26 - 33 |
| ६ | **साठोत्तरी साहित्य प्रवाहातील सामाजिक पर्यावरण** - डॉ. तातोबा बदामे | 34 - 41 |
| ७ | **स्त्रीलिखित कथेतील स्त्रीवादी जाणिवेच्या विविध अवस्था** - डॉ. सुवर्ण नामदेव पाटील | 42 - 48 |
| ८ | **दया पवार यांच्या साहित्यातील वेदना व विद्रोह अ** - डॉ. दिनेश पांडुरंग वाघुंबे | 49 - 56 |
| ९ | **साठोत्तरी चरित्र वाङ्मयातील सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचे व्यक्तिचित्रण** - विजयश्री गवळी | 57 - 65 |
| १० | **सावित्रीबाई फुले यांच्या व्यक्तित्वाचा आलेख मांडणाऱ्या कादंबऱ्या** - डॉ. कांचन नलावडे | 66 - 71 |
| ११ | **सानिया यांचे कथालेखन** - वनिता दिनकर होवाळे | 72 - 81 |
| १२ | **मराठी व्यस्त रंगभूमी**- डॉ. बळवंत मगदूम | 82 - 88 |
| १३ | **स्त्रीवादी साहित्यप्रवाह आणि आशा बगे यांचे कथालेखन** - सुनील श्रीशैल बुद्धनावर | 89 - 97 |

# साठोत्तरी साहित्य प्रवाहातील विमुक्तांचे वैचारिक लेखन

- डॉ. एम. के. शिंदे

मराठी साहित्यामध्ये १९६० नंतर अनेक अमुलाग्र बदल झालेले आहेत विशेष करून मराठी साहित्यामध्ये येणारे नवनवीन प्रवाहांनी साहित्याला वेगळी दिशा देण्याचे काम केलेले आहे. मूलतः हे बदल विशेष करून १९४० नंतर झालेले आढळतात. त्याचे मूळ कारण म्हणजे जागतिक पातळीवर झालेले दोन महायुद्ध आणि भारत स्वातंत्र्य त्याचबरोबर 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरीही मी हिंदू म्हणून मरणार नाही' अशी शपथ घेणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली घोषणा आणि धर्मांतर, १९६० च्या दशकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे झालेले महापरीनिर्वाण हे मूळ मराठी साहित्याला नवीन दिशा देणारे होते. साठोत्तरी साहित्य प्रवाहात अनेक नवनवीन प्रवाहांची भर पडलेली आहे त्यामध्ये दलित साहित्यप्रवाह, ग्रामीण साहित्यप्रवाह, आदिवासी साहित्यप्रवाह, जनवादी साहित्यप्रवाह, स्त्रीवादी साहित्यप्रवाह, विज्ञानवादी साहित्यप्रवाह, भटक्या विमुक्तांचा साहित्यप्रवाह असे नवनवीन प्रवाह उदयास आले. या विविध साहित्य प्रवाहांनी दलित साहित्याप्रमाणेच आपल्या प्रवाहांना धारदार बनवण्याचे कार्य केलेले आहे. विशेष करून साठोत्तरी साहित्य प्रवाहामध्ये दलितांनी लिहिलेले साहित्य हे साहित्य असते का असे अनेक मतमतांतरे पाहायला मिळतात. दलित साहित्यामध्ये ज्या पद्धतीने माणूस केंद्रस्थानी ठेवून लेखन केलेले आहे त्याच पद्धतीने भटक्या-विमुक्त साहित्य प्रवाहामध्ये चित्रण

आलेले आहे. विशेष करून हे साहित्य १९८० च्या नंतर अधिक जोरकसपणे पुढे आलेले पहावयला मिळते. त्याचं कारण म्हणजे स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये विमुक्त (माजी गुन्हेगार) जाती-जमाती यांची वेगळी ओळख झाली. खऱ्या अर्थाने त्यांना स्वातंत्र्य ३० ऑगस्ट १९५२ रोजी तत्कालीन भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मिळवून दिले. स्वातंत्र्याच्या पाच वर्षांनी हे स्वतंत्र विमुक्तांना मिळाले असले तरी खऱ्या अर्थाने त्यांना स्वातंत्र्य मिळाले नाही. विमुक्त म्हणून त्यांची ओळख असली तरी ते प्रस्थापितांच्या आणि पोलिसांच्या नजरेत कायम गुन्हेगारच राहिलेले आहेत. त्यामुळे त्यांना शैक्षणिक प्रवाहामध्ये येण्यास उशीर झाला व आपल्या साहित्यातून प्रश्न, दुःख, वेदना, विद्रोह त्यांना लवकर करता आलेला नाही. परिणामी उशिरा का होईना या विमुक्त जमातीने आपल्या वेदना मांडण्याचे काम कथा, कविता, नाटक, चरित्र-आत्मचरित्र, आत्मकथन, ललित लेखन, निबंध लेखन, वैचारिक साहित्य इत्यादींच्या माध्यमातून केलेले आहे.

मराठी साहित्यामध्ये कथा, कविता, नाटक, चरित्र-आत्मचरित्र, आत्मकथन याच बरोबर वैचारिक लेखन देखील भटक्या-विमुक्त जाती-जमाती मधील नवनवीन साहित्यिकांनी केलेले आहे. या जाती-जमातींना स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये अनेक संकटांना सामोरे जावे लागले. त्यांचे जीवन साहित्यातील विविध घटकातून उमटलेले पहावयास मिळते.

**विमुक्तांचे वैचारिक लेखन :-**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक नवतरुण शिक्षण घेऊन जोमाने लिहू लागले त्यामध्ये प्रभाकर मांडे, मोतीराज राठोड, लक्ष्मण माने, रामनाथ चव्हाण, भीमराव गस्ती, उत्तम कांबळे, नारायण भोसले, भीमराव चव्हाण, शंकरराव खरात, ना. धो. कदम, सतीश पवार यासारख्या अनेक लेखकांनी उशिरा का होईना विमुक्त जमातींवर वैचारिक लेखन करून जनजागृती करण्यास प्रारंभ केला. प्रभाकर मांडे यांनी 'गावगाड्याबाहेर' हा वैचारिक ग्रंथ १९८३ साली लिहिला. सदरील ग्रंथामध्ये गावगाड्याबाहेर राहणाऱ्या जाती-जमातीचे चित्रण आणि गावगाड्यातील आलुतेदार बलुतेदार यांच्या पासून मिळणारे साहित्य, कामधंदा इत्यादी विषयाचे वर्णन त्यांनी केले आहे. आपल्या ग्रंथात प्रभाकर मांडे म्हणतात, "ग्रामसभेच्या संस्कृतीत अनेक शतके घेऊनही आणि गावगाड्याच्या आश्रयाने जीवन जगत असूनही भटक्यांचे जीवन जगत असलेल्या जाती ग्राम संस्थेत दाखल होऊ शकल्या नाहीत. त्यांना कोणत्याही गावात वतनदार होता आलं नाही. गावगाड्याबाहेर राहून जीवन जगावे लागले."[1] म्हणजेच प्रस्थापित व्यवस्थेने विमुक्त जमातींना गुन्हेगार असल्यामुळे त्यांना स्वीकारलेले नाही.

### १. बाळकृष्ण रेणके :-

बाळकृष्ण रेणके यांनी 'भटक्या विमुक्तांचा एल्गार येत आहे' हा ग्रंथ १९८४ साली लिहिलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गुन्हेगार जाती-जमातींना लवकर स्वतंत्र का? मिळालेले नाही, राज्यघटनेनुसार कोणताही माणूस हा जन्मजात गुन्हेगार असू शकत नाही, हे तत्त्व घटनेने मान्य केलेली आहे. म्हणून १९२४ च्या कायद्यानुसार या गुन्हेगार जाती-जमातींना मुक्त करण्यात आलेले आहे. मानवी मूल्यांची जाणीव झाल्यानंतर स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यावर आधारलेले लोकशाही खऱ्या अर्थाने प्रस्थापित करण्यासाठी जाती, वर्ग, कष्टकरी, दीन-दलित, भटके, खीदास्य आणि आदिवासी वर्ग यांच्यासाठी एल्गार करून उठलेला आहे. याची मांडणी सदरील ग्रंथात केलेली आहे

### २. लक्ष्मण माने :-

लक्ष्मण माने यांनी अनेक ग्रंथातून वैचारिक लेखन केलेले आहे. त्यामध्ये 'बंद दरवाजा', 'पालावर जग', 'विमुक्त', 'भटक्यांचे भारुड', 'का ? कराच शिकून', 'खेळ साडेतीन टक्क्यांचा' अशा विविध ग्रंथातून गुन्हेगार जाती-जमातीचे प्रश्न प्रामुख्याने त्यांनी उपस्थित केलेली आहेत. गुन्हेगार ठरलेल्या जाती-जमातीतील रूढी, प्रथा, परंपरा, सण-उत्सव, लग्नविधी आणि भटक्या विमुक्त जाती-जमातीत असणारी जात पंचायत, पंच, त्यांचात पंचायतीची ठिकाणी प्रत्येक जाती जमातीची बोली भाषेचे महत्त्व, तिचा विकास, सांकेतिक भाषा याची मांडणी त्यांनी आपल्यासाहित्यामधून केलेली आहे. 'बंद दरवाजा त्यांनी १९८४ साली एकूण भटक्या जमातीची सद्य:स्थिती काय आहे, गावाकडे प्रस्थापित समाजव्यवस्थेतील लोक या जमातीकडे कसे पाहतात, चळवळीचे कार्यकर्ते म्हणून लक्ष्मण माने यांनी त्यांना आलेले अनेक विविध अनुभव त्यातून मांडलेले आहेत. स्वातंत्र्य मिळूनही या जमाती गुलामीत जीवन जगतात. शिक्षणापासून वंचित आहेत, गाव नाही, स्मशानभूमी नाही, कुठलाही विकास नाही, याचे चित्र त्यांनी 'बंद दरवाजा मधून रेखाटलेले आहे. 'पालावरचं जग मधून भटक्या-विमुक्तांच्या चळवळीचे सभा, परिषद आणि त्यांना गुन्हेगार म्हणून नव्हे तर माणूस म्हणून पहावे यासाठी लढा दिला आहे. 'बंद दरवाजा मधील आलेले काही भाग त्यांनी 'पालावरचं जग यात मांडलेले आहे. 'भटक्यांचे भारुड' वैचारिक लेखनातून भटक्या-विमुक्त जाती-जमातीचे सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रश्नांना वाचा आपल्या भाषणातून त्यांनी फोडलेली आहे

### ३. मोतीराज राठोड :-

मोतीराज राठोड यांनी 'भटक्या विमुक्तांचा जाहीरनामा' हा वैचारिक ग्रंथ लिहिलेला आहे. या वैचारिक लेख संग्रहात भटक्या-विमुक्तांच्या अस्मितेवर अवलंबून

आहे. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये गुन्हेगार जमातीला गुन्हेगार म्हणून जीवन जगावे लागले, त्याचे परिणाम सहन करावे लागतात. याची मांडणी यातून दिसते. भटक्या-विमुक्त जाती-जमाती कशा वंचित आणि उपेक्षित राहिलेल्या आहेत, पोलीस प्रशासन आणि समाज व्यवस्थेने या जाती-जमाती बद्दलचे असणारे खोटे गुन्हे काढून घेऊन त्यांना माणूस म्हणून जगू द्यावे. त्यांना सामाजिक न्याय द्यावा. ब्रिटिशांनी केलेले कायदे आजही भारतात चालू आहेत आणि हे कायदे माणुसकीला कलंक आहेत म्हणून भटक्या विमुक्तांचा जाहीरनामा घेऊन रस्त्यावर उतरलेले आहे.

**४. रामनाथ चव्हाण:-**

रामनाथ चव्हाण यांनी अनेक जाती-जमाती वर वैचारिक लेखन केलेले आहे. त्यामध्ये विशेष करून 'भटक्या-विमुक्तांचे अंतरंग', 'जाती आणि जमाती', 'वेदनेच्या वाटेवरून', 'भटक्या-विमुक्तांची जातपंचायत तिचे खंड अशा पद्धतीचे त्यांनी वैचारिक लेखन केलेलं आहे. 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग मध्ये विमुक्त जमातीचे जगणं, परंपरा, रीतिरिवाज आणि जवळून आलेले अनुभव या जाती-जमातीला माणूस म्हणून जगण्यासाठी आणि भटक्यांचे प्रश्न शासन दरबारी पोहोचण्यासाठी सभा, संमेलनं, मोर्चे, शोभयात्रा इत्यादी विषयांचे प्रश्न सोडविण्याचे सहकार्य केलेले आहे. रामनाथ चव्हाण आपल्या ग्रंथात म्हणतात की, "संस्कृती, रूढी, परंपरा, चालीरीती, देव-देवता, उत्सव, सणवार, त्यांची भाषा, पेहराव, दागदागिने, व्यवसाय आणि कला यांची जात पंचायत याची किमान ओळख वाचकांना व्हावी आणि त्यांच्या प्रश्नांचे व समस्यांचे स्वरूप काही प्रमाणात का होईना लक्षात यावे हाच पुस्तक लिहिण्यामागे माझा उद्देश आहे."[1] या जमातींना गावगाड्यात स्थान मिळालेलं नाही. वेशीबाहेर, गावकुसाबाहेर जीवन जगत आले आहेत. हे उपरं पणाने उपेक्षित आणि वंचित राहिले आहेत. त्यांची ओळख प्रस्थापित समाजव्यवस्थेला, लोकसमूहाला व्हावी याची जाणीव भटक्या-विमुक्तांच्या अंतरंगाची निर्मितीमध्ये केलेली आहे 'जाती आणि जमाती' या वैचारिक ग्रंथांमधून रामनाथ चव्हाण यांनी त्या तळागाळातील शेकडो वर्षे शिक्षण राजकारण, सत्ता न्याय, समता स्वातंत्र्य यापासून वंचित आणि उपेक्षित राहिलेल्या जाती-जमातीच्या प्रश्नांची उकल त्यांनी केलेली आहे. या जाती-जमातीचे व्यवसाय, पेहराव, दागदागिने, राहणीमान इत्यादी जीवनावश्यक संदर्भातील प्रश्नांची उकल व्हावी या हेतूने आणि पुरुषप्रधान व्यवस्थेने केलेल्या सामाजिक, आर्थिक, लैंगिक, राजकीय व्यवस्थेच्या बळी पडलेल्या, स्त्रियांचाही कहाण्यांचा आवाज प्रत्येक रविवारी १९९९ साली दैनिक सकाळ मधून प्रसिद्ध केले आहे. यावर रामनाथ चव्हाण म्हणतात की, "भटक्या-विमुक्तांच्या जात पंचायतीची, न्यायसंस्थेचे कुठेही लिखित स्वरूपात घटना नसताना किंवा काही लेखी टाकी नसताना पिढ्यानपिढ्या ही माणसं पाच दहा

वर्षापूर्वीच्या त्यांच्या जमातीच्या खटल्याची दाखले घेऊन आपले बाजू मांडतात. खटल्याचे न्यायनिवाडे होतात. अपराध्यांना शिक्षा होते. तात्काळ त्यांची अंमलबजावणी होते. या जात पंचायतीत मात्र स्त्रियांना विशेष महत्त्व दिले जात नाही याचे सविस्तर लेखन भटक्या-विमुक्तांच्या जातपंचायती मध्ये केलेले दिसून येते."[१] या वरील संदर्भातून लक्षात येते की जातपंचायती मधील बारकाईने पाहिल्यास जातीचे रिवाज त्या त्या जाती जमातींना लागू होतात. परंतु भारतीय कायदे प्रत्येक गुन्ह्यात वेगळे असले तरी शिक्षा आरोपीने केलेल्या गुन्ह्यावर अवलंबून असते स्त्रियांना जातपंचायतीला अधिक महत्त्व दिले नाही हेही स्पष्ट होते.

**५. भीमराव गस्ती :-**

भीमराव गस्ती यांनी 'आक्रोश' हा वैचारिक लेखन संग्रह लिहिलेला आहे. 'आक्रोश' मधून सत्य कथा लिहिली आहे. बेरड जमातीच्या व्यथा, वेदना, दुःख मांडण्याचं काम भीमराव गस्ती यांनी आक्रोश मधून केलेले आहे. बेरड जमातीला पोलिसांकडून होणारा छळ, प्रस्थापित समाजाकडून होणारा छळ, लाचारी आणि पिढ्यानपिढ्या चे दारिद्र्य त्यांच्या पाचवीला पुजलेले आहे याचे वास्तव यातून मांडण्याचा प्रयत्न आक्रोश मधून केलेला आहे.

**६. ना. धो. कदम :-**

'महाराष्ट्रातील भटका समाज संस्कृती व साहित्य' या माध्यमातून भटक्या जमाती वर केलेले संशोधन विस्तृत स्वरूपात मांडले आहे. महाराष्ट्रातील गुन्हेगार जाती-जमाती बरोबरच भटक्या जाती-जमातीचे मूळ शोधण्याचा काम प्रस्तुत ग्रंथातून ना. धो. कदम यांनी केलेली आहे.

**७. लक्ष्मण गायकवाड :-**

लक्ष्मण गायकवाड यांनी 'साहित्य समाज आणि स्वातंत्र्य' या वैचारिक ग्रंथांमधून भटक्या-विमुक्तांची प्रश्न, त्यांच्या चळवळीने घेतलेला पुढाकार आणि भटक्या विमुक्तांच्या लोकसाहित्य संकलन समाजाची नीटपणे मांडणी यातून दिसते. चोरी करण्याचे कारणे, माणूस गुन्हेगार होण्यास का प्रवृत्त होतो यावरही लक्ष्मण गायकवाड यांनी प्रकाश टाकलेला आहे.

**८. शंकरराव खरात :-**

शंकरराव खरात यांनी 'भटक्या विमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न' हा वैचारिक संशोधनात्मक लेख संग्रह लिहिलेला आहे. म्हणजे शंकरराव खरात यांनी या जाती-जमाती गुन्हेगार कशा झालेले आहेत व त्यांच्यावर झालेला अन्याय, अत्याचार, भटक्या-

विमुक्त जाती-जमाती मधील गुन्हेगारीचा मागोवा त्यांचे संघटन व मानवमुक्तीचा प्रचार आणि प्रसार यातून दिसून येतो.

९. **भीमराव चव्हाण:-**

भीमराव चव्हाण यांनी 'वडार समाज, इतिहास आणि संस्कृती' या वैचारिक ग्रंथांमध्ये वडार समाज गुन्हेगार कसा झाला आहे, वडारांच्या पोटजाती, देव, देवता, सण-उत्सव, प्रथा, परंपरा, वडार जमातीला गुन्हेगार कसे बनवले या विषयी लेखक भीमराव चव्हाण यांनी केलेले आहे. वडार समाजातील स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय मिळवण्यासाठी घटनात्मक सद्य:स्थितीत चिकित्सा केलेली दिसून येते.

सारांश रूपाने असे म्हणता येते की गुन्हेगार जाती-जमातींना सोसावे लागणारे दुःख, त्यांच्या जीवन जगण्याचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना वारंवार झगडावे लागले आहे. भटक्या-विमुक्तांना मधील नवतरूण कशा पद्धतीने लेखन करू लागले आपले हक्क विधानभवनात मांडून महाराष्ट्रात आवाज उठवू लागले याचे सबंध लेखन या वैचारिक साहित्याच्या माध्यमातून दिसून येते.

**संदर्भ यादी**


१. मांडे प्रभाकर, गावगाड्याबाहेर, परिमल प्रकाशन, औरंगाबाद १९८३ प्रस्तावना
२. चव्हाण रामनाथ, भटक्या-विमुक्तांचे अंतरंग सुगावा प्रकाशन पुणे, प्र.आ. ५ जानेवारी १९८९
३. चव्हाण रामनाथ, भटक्या-विमुक्तांची जातपंचायत देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा.ली. पुणे प्र. आ. ५ मार्च २००८



मराठी विभाग
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद
मो. नं. ८६२३०४८७११
ई-मेल : manikshinde222@gmail.com


•••